।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲

जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा.

## SPOT NEWS

### 'एसआयआर'ला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

● **मुंबई** – राज्यात सुरू असलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात सरासरी ७५ टक्के एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली असून मुंबई, ठाणेसारख्या भागातील डिजिटायझेशनचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास आहे. या पार्श्वभूमीवर या प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत भारत निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने राज्यातील सर्व निवडणूक अधिकारी, जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना सुधारित वेळापत्रकाची तत्काळ माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनाही सुधारित कार्यक्रमाची लेखी माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, नव्या मतदारांची नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि मतदान केंद्रांचे पुनर्रचनेचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने आयोगाने हा सुधारित कार्यक्रम जाहीर केल्याचे मानले जात आहे.

### मार्क झकरबर्ग यांनी मागितली माफी

● **नवी दिल्ली** – पैशांसाठी कंटेंट प्रमोट केल्याची चूक मेटाने कबूल केली असून बाल लैंगिक शोषण सामग्री, डीपफेक आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हीडीओ हटवण्यासह गंभीर चुकांवर फेसबुक आणि इन्स्टाग्रामची मालक कंपनी असलेल्या मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झकरबर्ग यांनी भारत सरकारची माफी मागितली आहे. केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि मेटाचे चीफ ग्लोबल अफेयर्स ऑफिसर जोएल कॅप्लन यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत मेटाच्या अधिकाऱ्यांनी सरकारने घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर झुकरबर्ग यांच्या वतीने खेद व्यक्त केला.

### गॅस सिलिंडरवर अतिरिक्त कर!

● **नवी दिल्ली** – इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. याचा फटका भारतासह अनेक देशांना बसला. अशातच आता आगामी काळात भारतातील एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. एका आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार केंद्र सरकार जवळपास ३.९९ लाख कोटी रुपये उभारण्याच्या योजनेवर विचार करत आहे. यासाठी एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणाऱ्या ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे समोर आले आहे. मात्र याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

## मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी विशेष अधिवेशन?

### केंद्र सरकारची धावाधाव, राहुल गांधींचा पाठिंब्यास नकार

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

विद्यार्थी आंदोलन, राम मंदिर दानपेटीतील चोरी प्रकरणी विरोधकानी सरकारला घेरलेले असताना आता पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या टप्प्यात केंद्र सरकारने मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी धावाधाव सुरू केली आहे. यासाठी सरकार १६ ते १८ ऑगस्टदरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू शकते. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आज संसदेत राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासोबत सुमारे ५० मिनिटे चर्चा केली. मात्र, राहुल गांधी यांनी पाठिंब्यास स्पष्ट नकार दिला.



मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याचा सरकारचा विचार आहे. यासाठी विरोधकांनी पाठिंबा द्यावा, असा सत्ताधा-यांचा आग्रह आहे. या पार्श्वभूमीवर रिजिजू यांनी राहुल गांधींशी चर्चा केली आणि विधेयक मांडण्यासाठी काँग्रेसचा पाठिंबा मागितला. मात्र, राहुल गांधींनी स्पष्टपणे नकार दिला. राहुल यांना प्रथम राम मंदिरातील लूट आणि लाठीचार्जच्या मुद्यावर चर्चा आणि उत्तरे हवी असल्याचे स्पष्ट केले. असे असले तरी विरोधी पक्षांशी चर्चा करून पाठिंबा मिळविण्याचा सत्ताधा-यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर सरकार विशेष अधिवेशन बोलावू शकते. १३ ऑगस्ट रोजी हे अधिवेशन संस्थगित होणार आहे.

दरम्यान, आज विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात निदर्शने केली. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे आणि इतर विरोधी खासदारांनी घोषणाबाजी करत गांधी पुतळ्यापासून मकरद्वारपर्यंत मोर्चा काढला. २० जुलै रोजी जंतरमंतर येथील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जवरून आणि राम मंदिरातील चोरीवरून विरोधी पक्षाचे खासदार सरकारला घेरत आहेत. गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत हजर राहून उत्तरे द्यावीत, अशी विरोधकांची मागणी आहे. एकीकडे विरोधक सरकारविरोधात आक्रमक असताना अधिवेशनाच्या अखेरच्या टप्प्यात केंद्र सरकारने मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी धावाधाव सुरू केली आहे.

लोकसभेतील जागांची संख्या वाढविण्यासाठी आणलेले १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक एप्रिल महिन्यात मंजूर करण्यात सरकारला अपयश आले. या विधेयकानुसार संसदेच्या ५४३ जागा वाढवून ८५० करण्याची तरतूद होती. २१ तासांच्या चर्चेनंतर लोकसभेत मतदान झाले. उपस्थित ५२८ खासदारांनी मतदान केले, ज्यात २९८ मते बाजूने आणि २३० मते विरोधात पडली. विधेयक मंजूर करण्यासाठी दोन–तृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. म्हणजेच ५२८ च्या दोन–तृतीयांश म्हणजे ३५२ मते आवश्यक होती. परंतु हे विधेयक ५४ मतांनी नामंजूर झाले. आपल्या १२ वर्षांच्या राजवटीत मोदी सरकारला सभागृहात एखादे विधेयक मंजूर करण्यात अपयश येण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यानंतर देशाच्या राजकारणात बरीच उलथापालथ झाली असून, एनडीएला पाठिंबा वाढला आहे. त्याच्या जोरावर सरकार हे विधेयक मंजूर करून घेण्याच्या प्रयत्नात आहे.

### राहुल गांधींसोबत ५० मिनिटे चर्चा

■ मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या नियोजनाच्या पार्श्वभूमीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेऊन ५० मिनिटे चर्चा करीत कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. राहुल गांधींची भेट घेतल्यानंतर रिजिजू यांनी गृहमंत्री अमित शाहांचीही भेट घेतली. आता ते अखिलेश यादव यांच्यासह इतर विरोधी पक्षातील नेत्यांची भेट घेणार आहेत.

## कॉक्रोच पार्टी दबावगट म्हणून काम करणार

● **छ. संभाजीनगर । वीरभूमी**–

सध्या 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी) दबावगट म्हणून काम करणार असून सध्याच्या घडीला भारताला अशाच एका प्रभावी दबावगटाची गरज आहे असे सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी बुधवारी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर येथे सीजेपीच्या मुख्य कार्यकारिणीच्या बैठकीपूर्वी पत्रकारांशी बोलताना दिपके म्हणाले की, या बैठकीत माध्यमे आणि न्यायव्यवस्था यांसारख्या संस्थांवरील जनतेचा ढासळत चाललेला विश्वास हा प्रमुख चर्चेचा विषय असेल. याशिवाय इथेनॉल मिश्रित इंधन आणि वाढती बेरोजगारी या मुद्यांवरही बैठकीत चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'सध्या तरी सीजेपी दबावगट म्हणूनच काम करेल, कारण सध्याच्या काळात देशाला अशा दबावगटाचीच गरज आहे असे दिपके यांनी सांगितले. सीजेपीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास यांनी सांगितले की, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे पुढेही पक्षाचे मार्गदर्शक राहतील आणि पक्ष त्यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन घेणार आहे.

अलीकडेच नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी आणि इतर परीक्षा गैरव्यवहारांविरोधात सीजेपीच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांविरोधात दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेण्यासाठी सीजेपी प्रयत्न करणार असल्याचे दास यांनी सांगितले. या मुद्यावर आम्ही सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा करत आहोत असे ते म्हणाले. देशभरातील अलीकडील विद्यार्थी आंदोलनांमध्ये जखमी झालेल्या आंदोलनकर्त्यांना कायदेशीर आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठीही आम्ही काम करत आहोत असेही दास यांनी सांगितले.

सीजेपीचे आंदोलन देशातील विविध शहरांमध्ये पसरले. मात्र, काही ठिकाणी आंदोलने हिंसक झाली. त्यानंतर दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि बिहारमध्ये पोलिसांनी विद्यार्थी आंदोलनकर्त्यांवर कारवाई करत त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल केले.

## कोपरगावात दोन तरुणांचा शेततळ्यात बुडून मृत्यू!

● **कोपरगाव । वीरभूमी**–

तालुक्यातील बहादराबाद ग्रामपंचायत हद्दीत गावाच्या आग्नेय बाजूस दिड कि.मी. अंतरावर असलेल्या दत्तवाडी येथील पाचोरे वस्तीवर शेतात असल्या खरीप पिकांवर फवारणी करत असलेले दोन तरुण दिपक रामचंद्र पाचोरे (वय ३३) व प्रशांत गीताराम पाचोरे (वय ३४) यांचा आज सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास तळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना प्रशांत पाचोरे याच्या पत्नीचे लक्षात आली तो पर्यंत खूप उशीर झाला होता. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.





शेततळ्यात किंवा पाण्याच्या स्रोतात बुडून तरुण आणि तरुण अथवा बालकांचे मृत्यू होणे ही अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक बाब बनली आहे. सिंचनासाठी केलेली शेततळी पाण्याचा साठा जपत असली, तरी योग्य सुरक्षा उपायांच्या अभावामुळे ती जीवघेणी ठरत आहेत. पाय घसरणे, पाणी घेण्याचा प्रयत्नात तलावाकाठी जाणे, पोहण्याचा मोह किंवा अपघातामुळे होणारे हे मृत्यू रोखण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना करणे गरजेचे आहे. शेततळ्यां–मुळे वाढत्या अपघातांची कारणे. शेततळ्यांभोवती संरक्षक जाळी किंवा कुंपण नसणे. ॲल्युसिट किंवा प्लास्टिक अस्तरीकरणामुळे तळ्याच्या काठावर पाय घसरणे. पोहण्याचा अंदाज न आल्याने किंवा पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात जाणे. सुरक्षेच्या सूचना किंवा इशाऱ्याचे फलक लावले गेलेले नसणे आदी कारणाने हे मृत्यू चिंताजनक ठरत आहे. अशीच घटना आज शिर्डी पोलिस ठाण्याच्या हद्दीत व कोपरगाव तालुक्यातील बहादराबाद शिवारात आज सकाळी ११.३० वाजता घडली आहे. सध्या पाऊस थांबला असल्याने खरीप पिकांवर रोगराई वाढल्याने पाठीवर पंप घेऊन फवारणी करण्याचे काम करत होते. मयत दोन्ही तरुण हे पंपातील पाणी संपल्याने तळ्यावर पाणी घेण्यासाठी गेले असता त्यांचा पाय घसरून तोल जाऊन ते पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.यातील प्रशांत पाचोरे याचे पाठीवर फवारणी करण्याचा पंप असल्याची माहिती हाती आली आहे. तो पाण्यात पडल्याने त्याला वाचवण्याचे प्रयत्नात दिपक पाचोरे गेला असावा. मात्र त्यात दोघांना हकनाक जीव गमवावा लागला आहे.

दरम्यान आपला पती प्रशांत पाचोरे हे का येईना म्हणून पत्नी शेतात त्यांना पाहण्यास गेली. पती शेतात दिसेना त्यामुळे तिने तलावाच्या दिशेने धाव घेतली असता ही दुर्दैवी घटना उघडकीस आली. यातील दिपक पाचोरे हा पाण्यात आढळून आल्याने त्याला ताबडतोब काढून उपचारार्थ शिर्डी येथील साई संस्थानच्या रुग्णालयात दाखल केले असता उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. तर दिपक पाचोरे हा तलावात सापडत नसल्याने अखेर उत्खनकाच्या (जे. सी.बी.)च्या सहाय्याने शेततळे फोडून दिले असता त्यात तो मृत तरुण आढळून आला आहे.त्यासाठी एन.डी.आर.एफ. च्या पथकाची मदत घेण्यात आली असल्याची माहिती बहादराबादचे माजी सरपंच विक्रम पाचोरे यांनी दिली आहे. घटनास्थळी कामगार तलाठी किशोर गटकळ यांनी धाव घेतली आहे.या घटनेने बहादराबाद,जवळके,वेस सोयगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

## काम सुधारा, नाहीतर विकेट पडणार!

### एकनाथ शिंदेंचा मंत्र्यांना सज्जड दम



● **मुंबई । वीरभूमी**–

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वी मंत्रालयात पार पडलेल्या शिवसेनेच्या स्वतंत्र बैठकीत मोठी राजकीय घडामोड पाहायला मिळाली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षाच्या चार मंत्र्यांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांना थेट पदावरून हटवण्याची धमकी दिली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांनी झापलेल्या ४ पैकी ३ मंत्र्यांची नावे समोर आली आहेत. यामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, वने व मदत पुनर्वसन मंत्री संजय राठोड आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा समावेश असल्याचे समजते. या मंत्र्यांच्या खात्याचा कारभार समाधानकारक नसून, वारंवार सूचना देऊनही त्यांच्या कामात सुधारणा झालेली नाही, अशी खंत शिंदे यांनी बैठकीत व्यक्त केली.

मंत्रालयात मंगळवारी पार पडलेल्या या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. 'जनतेची कामे मार्गी लावा, आपल्या मतदारसंघात लक्ष द्या आणि पक्षसंघटनेची वाढ करा. अन्यथा मला खांदेपालट करावा लागेल,' अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी मंत्र्यांना सुनावले. विदर्भ, वाशिम, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांमध्ये पक्षवाढीवर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या कडक सूचना त्यांनी दिल्या आहेत.

पक्षनेतृत्वाकडून दर ३ महिन्यांनी सर्व मंत्र्यांच्या कामगिरीचा एक अहवाल तयार केला जातो. या अहवालात जर संबंधित मंत्र्यांच्या कामाचा आलेख उंचावलेला दिसला नाही, तर आगामी मंत्रिमंडळ विस्तारात त्यांची उचलबांगडी निश्चित मानली जात आहे.

### तुम्ही नगराचे मालक नाही, सेवक आहात

■ मंत्र्यांसोबतच एकनाथ शिंदे यांनी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (उत्तन, भाईंदर) येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात नगरसेवकांचेही कान टोचले. कल्याण–डोंबिवली आणि अंबरनाथ–बदलापूर येथील नगरसेवकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, ''काही जण निवडून आल्यावर वॉर्डाचा सातबारा आपल्या नावावर झाला आहे, अशा थाटात वागतात. तसे वागल्यास पुढच्या निवडणुकीत जनता तुम्हाला घरी बसवते.'' शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'नगरपिता' ऐवजी 'नगरसेवक'हे नाव का दिले, याची आठवण त्यांनी आवर्जून करून दिली.

## राज्यातील हजारो निवासी डॉक्टर संपावर

### ओपीडीतील रुग्णसंख्या घटली

● **मुंबई । वीरभूमी**–

'बीएचएमएस' पदवीधरांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत सशर्त नोंदणी देण्याच्या निर्णयाविरोधात राज्यातील सुमारे ७ हजार निवासी डॉक्टरांनी बेमुदत संप पुकारला आहे. या आंदोलनामुळे मुंबईसह राज्यातील सरकारी रुग्णालयांतील 'ओपीडी' सेवा मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली असून शेकडो रुग्णांना उपचाराविना परतावे लागले.

आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग (आयसीयू) आणि नियोजित शस्त्रक्रिया सुरू ठेवण्यात आल्या असल्या तरी ओपीडीमधील वैद्यकीय सेवा मोठ्या प्रमाणात प्रभावित झाल्या. अनेक रुग्णालयांमध्ये ओपीडीतील रुग्णसंख्या जवळपास ५० टक्क्यांनी घटल्याचे चित्र दिसून आले. परिणामी शेकडो रुग्णांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली, तर अनेकांना उपचार न मिळाल्याने घरी परतावे लागले.

जिल्हा रुग्णालयांतील निवासी डॉक्टर संपावर गेल्याने सरकारी रुग्णालयांतील नियमित सेवा प्रभावित झाली असून, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटना, महाराष्ट्र स्टेट मेडिकल टीचर्स असोसिएशन, महाराष्ट्र सिनियर रेसिडेंट डॉक्टर असोसिएशन, मध्यवर्ती मार्ड आणि बीएमसी मार्ड सारख्या सहा मोठ्या डॉक्टर संघटना यात उतरल्या आहेत.

आंदोलनात आयएमएचे महाराष्ट्रातील सुमारे ५० हजार सदस्य आणि १३ हजार निवासी डॉक्टर सहभागी असल्याचा दावा करण्यात आला आहे. शिवाय लाखोंच्या संख्येत खासगी रुग्णालये व क्लिनिकमधील डॉक्टरांनी नियमित रुग्णसेवाही बंद केल्याने काही प्रमाणात प्रभावित होणार असल्याची माहिती आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. बीएचएमएस डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यक परिषदेत नोंदणी करू नये, या मागणीसाठी राज्यभरातील डॉक्टरांनी रुग्णसेवा बंद आंदोलन सुरूकेले. मुंबईतील केईएम, सायन, नायर, कूपर आणि जे. जे. या प्रमुख शासकीय रुग्णालयांमध्ये आंदोलनाचा पहिला दिवस असल्याने ओपीडीवर काही प्रमाणात परिणाम झाला. शिवाय वरिष्ठ प्राध्यापक, शिक्षक व तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णसेवेची धुरा सांभाळल्याने रुग्ण सेवा सावरल्याचे चित्र होते.


## ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट

### अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची माहिती

● **मुंबई । वीरभूमी**–

राज्यात शाळेबाहेर सकस आहाराचे आदेश दिले आहेत, त्याचे पालन सुरू आहे. फूड सेफ्टी आयुक्तांना लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने काही काळासाठी किंवा वेळेसाठी बंदी घालण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर बंदी घालण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले. ॲनालॉग पनीर म्हणून नॉन डेरी पनीर विकल जाते. त्याचे विपरीत परिणाम लक्षात घेऊन राज्यात ३० जुलै रोजी नोटीफिकेशन काढून उत्पादन प्रक्रिया, साठवणूक वाहतूक आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली असून, ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट केल्याचे मुंढे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर एका वर्षासाठी बंदी आहे, पुढे लागली तर ही बंदी वाढविली जाईल, असेही मुंढेंनी स्पष्ट केले. विभागाकडे अनेक तक्रारी होत्या, त्यावर चर्चादेखील सविस्तर झाली. विधिमंडळ सभागृहातही चर्चा झाली. त्यानंतर मार्केटमधून पनीरचे ३०८ नमुने घेतले होते. त्यामध्ये ८९ सबस्टँडर, ३८ असुरक्षित आढळले. ३२ टक्के नमुन्यांमध्ये सुरक्षितता नसल्याचे समोर आले, अशी



माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

पनीर हा दुधाचा पदार्थ आहे. पण ॲनालॉग पनीरमध्ये नॉन दुग्धजन्य पदार्थ आढळले. अशा स्थितीत लोकांची दिशाभूल होते म्हणून असे आदेश दिले आहेत. छुप्या पद्धतीने हे ॲनालॉग विकले जाऊ नये, म्हणून हा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे सगळे आदेश उत्पादक प्रक्रिया करणारे, वाहतूकदार, वितरक, विक्रेते यांच्यावर बंधनकारक आहेत. त्यामुळे हॉटेलही ॲनालॉग वापरू शकत नाहीत. या ॲनालॉग पनीरमध्ये प्रोटीनपेक्षा वनस्पती चरबी आढळली आहे, स्निग्धांश जास्त आहेत, म्हणून हे आदेश काढण्यात आले आहेत. अनॉलॉग पनीरसाठी कोणतेही स्टँडर्ड नाही, अशी माहिती मुंढे यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

आम्ही ३०८ ठिकाणांवरून पनीरचे नमुने घेतले होते, त्यातील ३५ टक्के नमुने घातक होते. आता आगामी काळात विशेष मोहीम राबवणार आहोत, जिथे गोदामे आहेत, तिथे तपासणी होणार आहे. आता आगामी काळात आस्थापनांनी दुधाच्याच पनीरचा वापर करावा, कुणी बनावट पनीर विकताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करणार आहोत.

ॲनालॉग आणि पनीरबाबत विशेष तपासणी मोहीम राबवणार असून संशयित उत्पादनांचे नमुने घेऊन पुढील कारवाई होईल. याबाबत सगळ्या अधिका–यांना कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्राहकांना ओरिजनल पनीर मिळावे, यासाठी प्रयत्न असून, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होणार नाही, असा इशारा मुंढेंनी दिला.

राज्यात २५ मेपासून ३१ जुलैपर्यंत राज्यात ३१३७ आस्थापनाची तपासणी केली असून ७६४ आस्थापनांना सुधारणा नोटीस बजावण्यात आली. तसेच १६५ आस्थापनांचा परवाना निलंबित करण्यात आला. आतापर्यंत २८,६६,०९६ किलो ग्रॅम माल नष्ट करण्यात आला. त्याची किंमत ५५.७२ कोटी रुपये आहे. तसेच राज्यात ८९० हॉटेलची तपासणी केली असून ३२९ हॉटेल्सला सुधारणा नोटीस बजावल्या तर ११६ हॉटेलचे परवाने निलंबित केले.

## शिंदेंसोबतचे आमदार अपात्र, नार्वेकर यांचा निर्णय अवैध

### कपिल सिब्बल यांचा सुप्रीम कोर्टात युक्तिवाद

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

ज्यावेळी एकनाथ शिंदे हे फुटीर आमदारांसोबत सूरत, गुवाहाटीला गेले त्यावेळी ते भाजपच्या संपर्कात होते. एक महाशक्ती आपल्या पाठीशी असल्याचे शिंदेंनी उघडपणे सांगितले होते. ते सातत्याने भाजपच्या संपर्कात होते, त्यांचे हे कृत्य म्हणजे पक्षविरोधी कारवाई होती, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. शिंदेंसोबत गेलेले आमदार हे अपात्र असून त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी दिलेला निर्णय हा अवैध असल्याचाही युक्तिवाद सिब्बल यांनी केला. गुरुवारी दुपारी २ वाजता यावर पुन्हा सुनावणी होणार आहे.

शिवसेना पक्ष आणि चिन्हावर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी झाली असून ठाकरे गटाच्या वतीने कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावर निवडणूक चिन्ह हे मूळ पक्षाचे असते की विधिमंडळ पक्षाचे, असा प्रश्न यावेळी सर्वोच्च न्यायालयाने विचारला. उद्धव ठाकरे शिवसेना प्रमुख असतानाच त्यांनी एकनाथ शिंदे यांची नेता म्हणून निवड केली. पक्षाच्या घटनेनुसार त्याची माहिती निवडणूक आयोगाला दिली होती, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे आमदार सुरत आणि गुवाहाटीला गेले, त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी विधीमंडळ गटाची बैठक घेऊन उद्धव ठाकरे यांनी अजय चौधरी यांची गटनेता म्हणून निवड केली होती, अशी माहिती कपिल सिब्बल यांनी न्यायालयाला दिली.

शिवसेना फुटल्यानंतर त्यावेळी शिंदेंसोबत गेलेले आमदार हे अपात्र होते, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. या गोष्टीनंतर ते आमदार आता पुन्हा नव्याने निवडून आले असले तरीही ठाकरेंच्या शिवसेनेकडून तसा युक्तिवाद केला जात आहे. त्यामुळे जर न्यायालयाने तो योग्य ठरवला तर त्यानंतरचे शिंदेंचे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह निवडणूक आयोगाचे निर्णय हे आपोआप चुकीचे ठरतील, असा युक्तिवाद त्यामागे आहे.

दहाव्या अनुसूची म्हणजे पक्षांतर बंदी कायद्यानुसार एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेले सगळे आमदार आपोआप अपात्र ठरतात. तसे झाले नाही तर दहाव्या अनुसूचीचा उपयोग काय, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

# SPOT NEWS

## एमआयडीसीतील कचरा, वीज व रुग्णालयाच्या प्रश्नांवर जिल्हाधिकाऱ्यांचा ॲक्शन मोड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

आमी संघटनेच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया यांच्या उपस्थितीत उद्योजक संवाद बैठक पार पडली. या बैठकीत एमआयडीसी परिसरातील कचरा व्यवस्थापन, वीजपुरवठा, ईएसआयसी रुग्णालय उभारणी, पाणीपुरवठा, औद्योगिक सुविधा तसेच विविध प्रलंबित प्रशासकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उद्योजकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीच्या प्रारंभी आमी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ही बैठक केवळ औपचारिक नसून उद्योग क्षेत्र आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यासाठी आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी एमआयडीसीतील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून त्यामुळे कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होत. असल्याचे निदर्शनास आणून दिले. काही ठिकाणी कचरा साचणे, सांडपाणी तुंबणे आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच एमआयडीसीमध्ये ईएसआयसी रुग्णालय उभारणीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून हजारो कामगारांच्या दृष्टीने तो अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी प्रशासनाच्या सहकार्यामुळे एमआयडीसीतील रस्ते, पथदिवे आदी काही प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त करत उर्वरित प्रश्नांवरही तितक्याच वेगाने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. बैठकीत उद्योजकांनी नवीन उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या सीएनजी गॅस मीटरची कमतरता, तसेच भविष्यात अपुरा पडणारा वीजपुरवठा तसेच पाणीपुरवठ्याच्या अडचणी मांडल्या. अनेक उद्योग सुरू होण्यास तयार असून मूलभूत सुविधांच्या अभावामुळे गुंतवणूकदारांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावर उत्तर देताना जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया म्हणाले उद्योग क्षेत्राच्या अडचणी प्राधान्याने सोडविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. उद्योजकांना मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधून तातडीने निर्णय घेतले जातील. कोणताही प्रश्न केवळ कागदावर राहणार नाही, तर त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही होईल. यावेळी प्रवीण जुंद्रे, सतीश गवळी, सागर निंबाळकर, सुमित सोनवणे, प्रकाश गांधी, सचिन पाठक, अमोल घोलप, गणेश कोलार, संजय बंदिष्टी, अनिल लोढा, मिलिंद कुलकर्णी, पुरुषोत्तम नावंदर, संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फिरोदिया शिवाजियन्सच्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत रंगला चुरशीचा थरार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) विविध वयोगटांतील सामने अत्यंत चुरशीचे आणि रंगतदार झाले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत आर्मी स्कूल, ऑर्चिड स्कूल आणि सेंट मायकल स्कूलच्या संघांनी दमदार कामगिरी करत विजय मिळवला. तर १६ वर्षांखालील मुलांच्या गटातील सेंट मायकल व तक्षिला स्कूल यांच्यातील सामना अखेर २-२ अशा बरोबरीत सुटल्याने उपस्थित प्रेक्षकांना अखेरच्या क्षणापर्यंत रोमांचकारी फुटबॉलचा अनुभव मिळाला. सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी स्कूल (एमआयसी एंड एस) आणि ऊर्जा गुरुकुल यांच्यात सामना झाला. सामन्याच्या तिसऱ्या मिनिटाला पलक सोनानिया हिने आर्मी स्कूलसाठी गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आर्मी स्कूलच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करत ऊर्जा गुरुकुलला अखेरपर्यंत एकही गोल करू दिला नाही. त्यामुळे आर्मी स्कूलने १-० अशा फरकाने विजयाची नोंद केली. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात जेएसएस गुरुकुल आणि ऑर्चिड स्कूल यांच्यातील सामना जेएसएस गुरुकुलचे खेळाडू नियोजित वेळेत मैदानावर उपस्थित न राहिल्याने खेळविण्यात आला नाही. नियमानुसार ऑर्चिड स्कूलला विजयी गुण प्रदान करण्यात आले. १६ वर्षांखालील मुलांच्या गटात ज्ञानसंपदा स्कूल आणि ऑर्चिड स्कूल यांच्यात अत्यंत रंगतदार सामना झाला. सामना शेवटपर्यंत अटीतटीचा राहिला. २१ व्या मिनिटाला मोक्ष गरदास याने गोल करत ज्ञानसंपदा स्कूलला आघाडी मिळवून दिली. मात्र ऑर्चिड स्कूलने जोरदार पुनरागमन केले. ३० व्या मिनिटाला पार्श बंब याने गोल करत सामना बरोबरीत आणला, तर ३३ व्या मिनिटाला पुन्हा गोल झळकावत संघाला आघाडी मिळवून दिली. ज्ञानसंपदा स्कूलला आणखी गोल करू न देता ऑर्चिड स्कूलने २-१ अशा फरकाने शानदार विजय मिळवला. दुपारच्या सत्रात १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूल आणि तक्षिला स्कूल यांच्यात सामना झाला. सेंट मायकल स्कूलच्या सारांश बोरा याने १९ व्या मिनिटाला, तर युग कांकरिया याने २५ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. तक्षिला स्कूलला एकही गोल करण्याची संधी न देता सेंट मायकल स्कूलने २-० असा एकतर्फी विजय मिळवला. १४ वर्षांखालील मुलांच्या गटातही सेंट मायकल स्कूलने आपला विजयी झेंडा कायम राखला. तक्षिला स्कूलविरुद्धच्या सामन्यात २१ व्या मिनिटाला शौर्य चंगेडिया याने पहिला गोल केला. त्यानंतर ३० व्या मिनिटाला अनिश झांजे याने आणखी एक गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. उत्कृष्ट बचावाच्या जोरावर तक्षिला स्कूलला एकही गोल करू न देता सेंट मायकल स्कूलने २-० असा विजय संपादन केला. दिवसातील सर्वाधिक रोमांचक सामना १६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूल आणि तक्षिला स्कूल यांच्यात झाला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि वेगवान खेळाचे प्रदर्शन केले.

# भाळवणीच्या बारवेतील १७८१ सालचा शिलालेख उजेडात

**मराठाकालीन जलव्यवस्थापनाचा दुर्मीळ ऐतिहासिक दस्तऐवज । बावजी भट-नारायण भट-माधव या तीन पिढ्यांचा उल्लेख**

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील भाळवणी गावाजवळील एका जुन्या बारवेच्या पायऱ्यांवर कोरलेला इ.स. १७८१ सालचा शिलालेख प्रकाशात आला असून, अठराव्या शतकातील धार्मिक श्रद्धा, दानपरंपरा, जलव्यवस्थापन आणि स्थानिक स्थापत्यकलेवर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकणारा हा पुराभिलेख असल्याचे स्पष्ट झाले आहे. पारनेर-भाळवणी मार्गावर जामगावपासून काही अंतरावर, भाळवणी गावाच्या हद्दीजवळ रस्त्यालगत असलेल्या बारवेच्या पायऱ्या उतरताना उजव्या बाजूला उंचावर हा शिलालेख कोरलेला आहे.

सदर शिलालेख सात ओळींचा असून देवनागरी लिपीत मराठी-संस्कृत मिश्र भाषेत कोरलेला आहे. अक्षरे स्पष्ट आणि एकसारखी असून, दीर्घकाळ वातावरणाचा परिणाम झाल्याने लेखाची काही प्रमाणात झीज झाली आहे. तसेच दुर्लक्षामुळे शिलालेखावर शेवाळ आणि पांढऱ्या चट्ट्यांचे आवरण निर्माण झाले आहे. मात्र थोड्या प्रयत्नाने संपूर्ण लेख वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन**

**१.।। श्री शंकर ।।**
**२.।। स्वस्ति श्री शालिवाहावनिपती नव खक्ष्मा ।।**
**३.।। भूदुर्वी १७०३शके वैख्यात वर्षे प्लवंगे मधुः सि ।।**
**४.।। त दशमीसुतिथौ जीववारे ।। वापीमभ्यं ।।**
**५.।। कराख्यः परमशिवमुदे बावजी भट पु त्र ।।**
**६.।। त्र श्री मन्नारायणद्विप्रवर तनुभावो ।।**
**७.।। माधवः प्रोत्ससर्ज ।। श्री रामनाम ।।**

**१७ मे १७८१ रोजी बारवेच्या निर्मितीची नोंद**

शिलालेखाच्या आशयानुसार, शालिवाहन शक १७०३, प्लवंग नाम संवत्सर, वैशाख वद्य दशमी, गुरुवार या दिवशी या वापीची निर्मिती करण्यात आली. ही तारीख इ.स. १७८१ शी संबंधित आहे. भगवान शिवाच्या प्रसन्नतेसाठी आणि पुण्यप्राप्तीच्या उद्देशाने ही वापी बांधण्यात आली किंवा तिचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असल्याचे लेखातून दिसून येते.

शिलालेखात बावजी भट, त्यांचे पुत्र श्री नारायण भट आणि नारायण भट यांचे पुत्र माधव अशा तीन पिढ्यांचा उल्लेख आढळतो. त्यामुळे केवळ बारव बांधल्याची माहितीच नव्हे, तर त्या काळातील कुटुंबपरंपरा, सामाजिक स्थान आणि धार्मिक कार्यातील सहभागाचीही नोंद या शिलालेखातून मिळते.

शिलालेखात वापीचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळे हा लेख बारव अथवा पायऱ्यांची विहीर बांधण्याशी संबंधित असल्याचे दिसून येते. अठराव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्रात अशा बारवा पिण्याचे पाणी, प्रवाशांची सोय, शेतकरी आणि ग्रामस्थांच्या दैनंदिन गरजा यासाठी महत्त्वाच्या सार्वजनिक सुविधा होत्या.

धार्मिक पुण्यप्राप्तीच्या भावनेतून उभारलेली ही जलरचना प्रत्यक्षात लोकांच्या दैनंदिन जीवनासाठी उपयोगी ठरत होती. त्यामुळे या शिलालेखातून तत्कालीन समाजातील धार्मिक दान आणि लोककल्याणकारी जलव्यवस्थापन यांचा परस्पर संबंध स्पष्टपणे दिसून येतो.

शिलालेखाच्या प्रारंभी 'श्री शंकर' असा मंगलाचरणात्मक उल्लेख आहे. तसेच 'परमशिवमुदे' या शब्दप्रयोगातून भगवान शिवाच्या प्रसन्नतेसाठी हे कार्य करण्यात आल्याचे सूचित होते. विशेष म्हणजे शिलालेखाच्या शेवटी 'श्री रामनाम' असा मंगल उल्लेख करण्यात आला आहे.



प्रारंभी शंकर आणि शेवटी श्रीराम असा उल्लेख आढळत असल्याने तत्कालीन धार्मिक वातावरणातील विविध भक्तिपरंपरांचा अभ्यास करण्यासाठीही हा लेख महत्त्वाचा ठरतो. मात्र या आधारे व्यापक धार्मिक समन्वयाचा निष्कर्ष काढताना अभिलेखातील शब्दरचना आणि तत्कालीन स्थानिक संदर्भांचा अधिक अभ्यास आवश्यक ठरतो.

शिलालेखात शक वर्ष, संवत्सर आणि तिथीचा उल्लेख असल्यामुळे बारवेच्या निर्मितीचा काल निश्चित करण्यासाठी हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. स्थानिक इतिहास, अभिलेखविद्या, कालगणना, मराठाकालीन स्थापत्य आणि तत्कालीन जलव्यवस्थापनाच्या अभ्यासासाठी या शिलालेखाचे विशेष महत्त्व आहे.

अठराव्या शतकातील महाराष्ट्रात सार्वजनिक उपयोगाच्या जलरचना उभारण्यासाठी धार्मिक दान, वैयक्तिक पुढाकार आणि सामाजिक बांधिलकी यांचा कसा उपयोग होत होता, याचे भाळवणीतील बारव हे एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणता येईल.

सध्या शिलालेखावर शेवाळ, पांढरे चट्टे आणि वातावरणामुळे झालेली झीज दिसून येते. त्यामुळे या ऐतिहासिक दस्तऐवजाचे तातडीने शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करणे आवश्यक आहे. शिलालेखाची स्वच्छता करताना त्यावरील मूळ अक्षरांना कोणतीही हानी होणार नाही, याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

भाळवणी परिसरातील या बारवेकडे केवळ जुन्या जलरचनेच्या दृष्टीने न पाहता, अठराव्या शतकातील स्थानिक समाजजीवन आणि इतिहासाची साक्ष देणारा पुराभिलेख म्हणून पाहण्याची गरज आहे. शिलालेखाचे दस्तऐवजीकरण, छायाचित्रण, अचूक वाचन, भाषांतर आणि शास्त्रीय संदर्भांसह नोंदणी झाल्यास स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाला मोठी मदत होऊ शकते.

या शिलालेखाची माहिती, संकलन, वाचन व संशोधन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे त्यांना डॉ. शैलेंद्र भांडारे यांनी सहकार्य केले आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करून वारंवार अत्याचार; पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी –**



तालुक्यातील पश्चिम भागातील एका मोठ्या गावातील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे घरातून जबरदस्तीने अपहरण करून तिच्यावर विविध ठिकाणी नेऊन वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध अपहरण, बलात्कार, धमकी तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही पाथर्डी तालुक्यातील रहिवासी असून तिचे आई-वडील ऊसतोड मजूर म्हणून काम करतात. ऊसतोडीच्या कामादरम्यान संबंधित आरोपी व त्याच्या कुटुंबीयांशी त्यांची ओळख झाली होती. फिर्यादीनुसार, मार्च २०२६ मध्ये आरोपीने मुलगी घरी एकटी असताना तिला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून एका अनोळखी गावात नेले. तेथे तिच्यावर इच्छेविरुद्ध लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर तिला पुणे जिल्ह्यातील शिरूर नाव्हरा परिसरात नेऊन ऊसतोडीच्या कामावर ठेवण्यात आले. त्या काळातही आरोपीने वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच हा प्रकार कुणालाही सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, १ ऑगस्ट रोजी पीडित मुलीने एका अनोळखी महिलेच्या मोबाईलवरून आपल्या आईशी संपर्क साधून आपण नाव्हरा शिरूर येथे असल्याची माहिती दिली. त्यानंतर मुलीचे आई-वडील शिरूर येथे जाऊन तिला ताब्यात घेऊन घरी आणले. घडलेला प्रकार मुलीने आई-वडिलांना सांगितल्यानंतर त्यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलिस करत असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली होलेवाडी येथील कालव्याची पाहणी

**शेतकऱ्यांच्या हिताच्या कामांना गती देण्याचे निर्देश**

**● कर्जत । वीरभूमी–**

राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज कर्जत तालुक्यातील होलेवाडी येथील कालव्याची प्रत्यक्ष पाहणी करून दुरुस्ती कामाचा आढावा घेतला. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या कालव्याची तातडीने दुरुस्ती करण्यात आली असून, या कामाच्या गुणवत्तेची आणि प्रगतीची त्यांनी पाहणी केली.



सन २०२५-२६ मधील अतिवृष्टीमुळे होलेवाडी येथील कालव्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागामार्फत कालव्याच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली होती. या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

यावेळी त्यांनी उपस्थित शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व सूचना जाणून घेतल्या. शेतीला आवश्यक असलेली सिंचन व्यवस्था सक्षम राहण्यासाठी कालव्यांची नियमित देखभाल व आवश्यक त्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करावीत, तसेच शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित विकासकामांना प्राधान्य देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, तहसीलदार रवी सत्वन, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चार हजार कोटींच्या आ.काळे यांच्या दाव्याचा उडाला फज्जा

**टाकळी-ब्राम्हणगाव रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिक संतप्त**

**● कोपरगाव । वीरभूमी –**

मतदारसंघात आ.काळे यांचे विकासकामांच्या नावाखाली करण्यात आलेल्या चार हजार कोटी रुपयांच्या दाव्याचा फज्जा उडाल्याचे वास्तव आता नागरिकांसमोर आले आहे. टाकळी-ब्राम्हणगाव या महत्त्वाच्या रस्त्याची अवघ्या काही काळातच झालेली अत्यंत दयनीय अवस्था ही निकृष्ट दर्जाची साक्ष देत असून, संपूर्ण मतदारसंघातील रस्त्यांची झालेली चाळणी पाहता विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, अशी भावना अशोक बनकर यांनी व्यक्त केली आहे.

टाकळी-ब्राम्हणगाव मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यावरील डांबर पूर्णपणे उखडले आहे व दगड उघडे पडले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार, चारचाकी चालक, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतकऱ्यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात या रस्त्याची परिस्थिती आणखी बिकट होत असून अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

एकीकडे चार हजार कोटींच्या विकासकामांचा गवगवा केला जात असताना प्रत्यक्षात नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. टाकळी-ब्राम्हणगाव रस्ता हा केवळ एक नमुना असून मतदारसंघातील अनेक प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांची अवस्था यापेक्षाही गंभीर आहे. त्यामुळे मोठमोठ्या घोषणांपेक्षा दर्जेदार आणि टिकाऊ विकासकामांची गरज असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

मागील पंचवार्षिक कार्यकाळ आणि त्यानंतरचा सध्याचा कार्यकाळ तरीही मतदारसंघात सर्वसामान्यांना जाणवेल असा विकास दिसून येत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. रस्ते, पाणी, पायाभूत सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे आ.काळे यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.



चार हजार कोटी रुपयांच्या दाव्याचा गवगवा करण्याऐवजी प्रत्यक्षात झालेल्या कामांची गुणवत्ता आणि त्याचा जनतेला झालेला लाभ याचा हिशेब देण्याची वेळ आता आली आहे. टाकळी- ब्राम्हणगाव रस्त्यासह मतदारसंघातील सर्व निकृष्ट रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही बनकर यांनी दिला आहे.

# वैभवराव पिचड यांच्या पाठपुराव्याने रतनवाडीतील झडे कुटुंबाला ४ लाखांची तातडीची मदत

**मराठाकालीन जलव्यवस्थापनाचा दुर्मीळ ऐतिहासिक दस्तऐवज । बावजी भट-नारायण भट-माधव या तीन पिढ्यांचा उल्लेख**

**● अकोले । वीरभूमी –**

तालुक्यातील रतनवाडी येथे अतिवृष्टीमुळे घराची भिंत कोसळून आठ महिन्यांच्या सृष्टी अशोक झडे या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिची आई जखमी झाली. या दुर्घटनेनंतर माजी आमदार वैभवराव पिचड यांनी मंगळवारी रात्री झडे कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क साधून शासनाच्या आपत्कालीन निधीतून तातडीने मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानंतर अशोक अमृता झडे यांच्या बँक खात्यात थेट ४ लाख रुपयांची मदत जमा झाली.

सोमवारी मध्यरात्री अमृता झडे व अशोक झडे यांच्या घराची भिंत अचानक कोसळली. या दुर्घटनेत आठ महिन्यांची सृष्टी झडे हिचा मृत्यू झाला, तर तिची आई जखमी झाली. अशोक झडे आणि त्यांची पत्नी या दोघांचा जीव थोडक्यात बचावला.

मागील २० दिवसांपासून रतनवाडी गावातील वीजपुरवठा खंडित असल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली होती. जखमी आई व मुलीला उपचारासाठी शेंडी येथील आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, तेथे रुग्णालयाला कुलूप असल्याने वेळेत उपचार मिळू शकले नाहीत. डॉक्टरांचा शोध घेताना मुलीच्या वडिलांची मोठी धावपळ झाली. उपचारास झालेल्या विलंबामुळे अखेर सृष्टीचा मृत्यू झाला.

घटनेनंतर वैभवराव पिचड यांनी झडे कुटुंबाकडून संपूर्ण घटनाक्रम जाणून घेतला. महसूल विभागाकडून अद्याप स्पॉट पंचनामा झाला नसतानाही ग्रामपंचायतीने तयार केलेला पंचनामा मुख्यमंत्री कार्यालय आणि पालकमंत्र्यांकडे पाठवून तातडीची मदत मंजूर करण्याची विनंती त्यांनी केली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शासनाने ४ लाख रुपयांची मदत थेट झडे कुटुंबाच्या खात्यात जमा केली.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

याबद्दल दगडू पांढरे, भरत घाणे, अनंत घाणे, संपत झडे, सोमनाथ झडे, पांडुरंग खाडे, सुनील सारुक्ते, बाजीराव सगभोर, सुरेश गभाले, संतोष सोडनर यांच्यासह ग्रामस्थांनी माजी आमदार वैभवराव पिचड यांचे आभार मानले.

### पांजरेतील भूस्खलनग्रस्त शेतकऱ्यांचीही विचारपूस

■ रतनवाडी भेटीदरम्यान वैभवराव पिचड यांनी पांजरे येथे भूस्खलनामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचीही भेट घेतली. प्राथमिक मदत मिळाली का, याची त्यांनी माहिती घेतली. यावेळी सुभाष उघडे, रामा उघडे, अशोक उघडे यांच्यासह ग्रामस्थांनी अनेक अधिकारी व लोकप्रतिनिधी भेट देऊन गेले, मात्र रेशन वगळता कोणतीही शासकीय मदत अद्याप मिळालेली नसल्याची व्यथा मांडली. यावर शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी स्वतः पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही वैभवराव पिचड यांनी दिली.

# SPOT NEWS

## अशोक गायकवाड यांच्या निधनामुळे ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा स्थगित

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात ९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय मोर्चा आंबेडकरी चळवळीतील झुंजार, अभ्यासू व संघर्षशील नेतृत्व अशोक गायकवाड यांच्या आकस्मिक निधनामुळे स्थगित करण्यात आला आहे. समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. बैठकीत ठरविण्यात आले की, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता अशोक गायकवाड यांच्या निवासस्थानी जलदान विधी पार पडणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता नगर–मनमाड रस्त्यावरील वृंदावन लॉन्स येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोकसभेला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्यासह राज्यातील विविध नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार, खासदार, महानगरपालिका आयुक्त, सर्व नगरसेवक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि समाजबांधवांना उपस्थित राहून अशोक गायकवाड यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रश्नावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात नियोजित मोर्चा पुढील महिन्यात अधिक व्यापक, संघटित आणि तीव्र स्वरूपात काढण्याचा निर्धार करण्यात आला. उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द होईपर्यंत संविधान, सामाजिक न्याय आणि समतेच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी त्यांच्या वर एक डॉक्युमेंट्री करण्यात येणार आहे त्यासाठी त्यांच्या आंदोलनातील फोटो नगरसेवक सुरेश बनसोडे व सुमेध गायकवाड यांच्या कडे जमा करावे. बैठकीस नगरसेवक सुरेश बनसोडे, सुनील साळवे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, सुरेंद्र थोरात, सुनील शेत्रे, अजय साळवे, परिमल निकम, हर्षल गायकवाड, प्रा जयंत गायकवाड, नाथा अल्हाट, किरण दाभाडे, एन एम पवळे, निवृत्ती आरू, विजयराव भांबळ, महेश भोसले , मृणाल भिंगारदिव ,विलास साठे, प्रा एल बी जाधव, सिद्धार्थ आढाव, अमित काळे ,शनेश्वर पवार, दया गजभिये, महेंद्र राजगुरू, विजय गायकवाड, भाऊ भिंगारदिवे, विशाल कांबळे, विशाल गायकवाड, आप्पासाहेब मकासरे, विशाल भिंगारदिवे, प्रा भिमराव पगारे, कौशल गायकवाड, गौतमी भिंगारदिवे, जयश्री गायकवाड, किरण गायकवाड, अविनाश भोसले, सिद्धांत गायकवाड, गणेश गायकवाड, पवन भिंगारदिवे, मयूर पाखरे, अजिंक्य भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, प्रताप भिंगारदिवे, अजय पाखरे, सुरेश भिंगारदिवे, सिद्धार्थ भिंगारदिवे, रवी कांबळे, आकाश तांबे, अक्षय गायकवाड, सिद्धार्थ पवार, संदीप वाकचौरे आदीसह यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यापूर्वी नियोजित मोर्चात जिल्हाभरातील समस्त आंबेडकरी समाज, विविध सामाजिक संघटना, शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी तसेच संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार होते. मात्र, अशोक गायकवाड यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर मोर्चा पुढे ढकलण्यात आला असून तो पुढील महिन्यात अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

## दिल्ली गेटवरून 'राष्ट्रीय धारणालय क्रांती'ची घोषणा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जातिव्यवस्था, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा, दैववाद, व्यक्तिपूजा आणि स्वार्थी सत्तालालसा या भारताच्या समताधिष्ठित, विज्ञाननिष्ठ आणि संविधाननिष्ठ राष्ट्रीय धारणालयाच्या शत्रू प्रवृत्ती आहेत. या मानसिक गुलामगिरीविरुद्ध ८ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगरच्या ऐतिहासिक दिल्ली गेटवरून 'राष्ट्रीय धारणालय क्रांती'ची घोषणा करण्यात येणार आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने 'जंतर-मंतर क्रांती दिना'निमित्त या लोकशिक्षण चळवळीचा प्रारंभ होणार असल्याची माहिती ड. कारभारी गवळी यांनी दिली. व्यक्तीच्या मेंदूत आयुष्यभर साठणारे ज्ञान, अनुभव, संस्कार, श्रद्धा, भीती आणि पूर्वग्रह यांचे बिगर–आनुवंशिक माहितीभांडार म्हणजे धारणालय. हेच व्यक्तीच्या वर्तनाची अंतर्गत राज्यघटना म्हणून काम करते. धारणालयात जातीयता, स्त्रीविरोध, मतदास्य आणि अंधश्रद्धा रुजल्यास सामाजिक विषमता आणि मानसिक गुलामगिरी टिकून राहते. मात्र संघर्ष माणसाविरुद्ध नसून, त्याच्या धारणालयातील अन्यायकारी आणि कालबाह्य प्रवृत्तींविरुद्ध आहे. माणूस शत्रू नाही; जातिव्यवस्था, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा आणि दैववाद या राष्ट्रीय धारणालयाच्या शत्रू प्रवृत्ती आहेत, हा या क्रांतीचा मुख्य संदेश असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. न्यूरोप्लास्टिसिटीमुळे मेंदूच्या सवयी, शिकण्याच्या पद्धती आणि विचार जाळे बदलता येतात. विवेकाच्या साहाय्याने त्याची पुनर्घटना करता येते. ही क्षमता मानवाला मिळालेले निसर्गाचे वैज्ञानिक पसायदान असल्याचे म्हंटले आहे.

# कालवा दुरुस्तीसाठी निधी कमी पडू देणार नाही

### पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील | कुकडी व घोड प्रकल्पातील प्रलंबित कामांचा घेतला आढावा

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

राज्याला दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने जलसंपदा प्रकल्पांची कामे वेगाने पूर्ण करण्यावर शासनाचा भर असून, शेतकऱ्यांना सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.




श्रीगोंदा येथे आयोजित बैठकीत त्यांनी कुकडी व घोड प्रकल्पातील प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी जलसंपदा विभागाची कामे वेळेत पूर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पहिल्या टप्प्यात दोन वर्षांत पूर्ण होऊ शकणाऱ्या कामांना प्राधान्य देण्यात येत असून, त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

पालकमंत्री म्हणाले की, श्रीगोंदा तालुक्यातील पाच महत्त्वाच्या विकासकामांच्या निविदा पूर्ण झाल्या असून, या माध्यमातून तब्बल १३२ कोटी रुपयांची विकासकामे हाती घेतली जात आहेत. कालव्यांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. सिंचन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी वेळेत आणि पूर्ण क्षमतेने मिळणे हेच शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत त्यांनी विविध कामांबाबत अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. सरस्वती नदीतील गाळ काढणे, नदीचे रुंदीकरण तसेच सुशोभीकरणासाठी तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच विसापूर व कुकडी कालव्याची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, पाणी वापर संस्थांची बैठक आयोजित करून शेतकऱ्यांशी समन्वय वाढवावा आणि अधिकाऱ्यांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून त्या तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार विक्रम पाचपुते यांनी सांगितले की, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय राहिल्यास शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न वेगाने मार्गी लागू शकतात. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत सिंचनाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले असून, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीपूर्वी त्यांनी रुईगव्हाण येथील कुकडी डावा कालवा भोसे खिंड शीर्ष विमोचक तसेच बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची देखील त्यांनी पाहणी केली.

यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव, उपविभागीय अधिकारी श्री. चिंचकर, सुनीता खेतमाळीस, तहसीलदार, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत कुकडी व घोड प्रकल्पांशी संबंधित विविध विकासकामे, कालव्यांच्या दुरुस्त्या, सिंचन व्यवस्थेची कार्यक्षमता आणि शेतकऱ्यांच्या समस्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## कोतूळ खोऱ्यातील वीज प्रश्नांवर आंदोलनाला यश; महावितरणकडून विविध मागण्या मंजूर

**● अकोले । वीरभूमी –**

कोतूळ खोऱ्यातील गंभीर वीज समस्यांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) – मुळा विभाग आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), अकोले तालुका समिती यांच्या वतीने कॉ. सदाशिव साबळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या आंदोलनाला व सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. महावितरणच्या राजूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता विठ्ठल सोनवणे यांनी विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतल्याची माहिती दिली.

महावितरणच्या आश्वासनानुसार पिंपळगाव खांड येथील नादुरुस्त रोहित्र बदलण्यात आले आहे. तसेच फोफसंडी–मुठेवाडी परिसरातील धोकादायक विद्युत तारा आणि अतिरिक्त वीज खांबांचे सर्वेक्षण करून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

धामणगाव पाट येथे नवीन वीज लाईन विस्तारासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात येणार असून, तेथे तीन नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. निधी उपलब्ध होताच हे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले.

नेसाई वस्तीतील सुमारे ४० कुटुंबांना नियमित वीज जोडणी देण्यासाठी प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच नियमित वीजबिल वितरण, धोकादायक तारा, झुकलेले वीज खांब आणि जीर्ण वीज यंत्रणेच्या दुरुस्तीची कार्यवाहीही केली जाणार आहे. स्मार्ट मीटरबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारी वरिष्ठ स्तरावर पाठवून त्यावर योग्य निर्णय घेण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

या निर्णयांमुळे कोतूळ खोऱ्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, जनतेची एकजूट आणि सातत्यपूर्ण लोकआंदोलनामुळे हा विजय मिळाल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. जनहिताच्या प्रश्नांवर सर्वपक्षीय सहकार्य आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून भविष्यातही संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार कॉ. सदाशिव साबळे यांनी व्यक्त केला.

## लक्ष्मी यात्रा उत्सवाची पोतराजासह शहरातून मिरवणूक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

आषाढ महिन्यानिमित्त शहरातील काटवण खंडोबा रोड येथील गाडळकर मळा परिसरात पाचारणे कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पारंपरिक लक्ष्मीआई यात्रा उत्सव यंदाही मोठ्या भक्तिभाव आणि उत्साहात साजरा करण्यात आला. भंडाऱ्याची उधळण, पारंपरिक वाद्यांचा गजर, पोतराजांचा सहभाग आणि लक्ष्मीआईच्या नावानं चांगभलंच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

यात्रेच्या मिरवणुकीचा शुभारंभ पाचारणे कुटुंबीयांच्या हस्ते व गुरुवर्य रमाई यांच्या आशीर्वादाने नारळ वाढवून करण्यात आला. यानंतर घोड्यांच्या आकर्षक बग्गीत विराजमान असलेल्या लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि पोतराजांच्या उपस्थितीत निघालेल्या या मिरवणुकीने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

मिरवणुकीत भाविकांनी भंडाऱ्याची उधळण करत लक्ष्मीमातेचा जयघोष केला. भक्तीमय वातावरणात युवकांनी भक्तिगीतांच्या तालावर ठेका धरत उत्सवाचा आनंद लुटला. पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

ही शोभायात्रा काटवण खंडोबा रोड, आयुर्वेद कॉलेज चौक, वाडिया पार्क, माळीवाडा मार्गे माळीवाडा येथील लक्ष्मीमाता मंदिरात पोहोचली. मंदिरात धार्मिक विधी व आरतीनंतर मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

यावेळी मिरवणुकीत हिराबाई रमेश पाचारणे, विकास पाचारणे, कविता पाचारणे, आलका पाचारणे, कुणाल पाचारणे, उज्वला खंडागळे, अंजली कापसे, राजू पाचारणे आदींसह युवक, महिला व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या लक्ष्मीआई यात्रेला सुमारे २० ते ३० वर्षांची परंपरा लाभली आहे. धार्मिक परंपरा, लोकसंस्कृती आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा हा यात्रा उत्सव परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरतो.

दरम्यान, यात्रेच्या आदल्या दिवशी पाचारणे कुटुंबीयांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. या भंडाऱ्यालाही नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

# पारनेरमध्ये 'दहा करोड नशामुक्त महाअभियान'ला गती

### ब्रह्माकुमारी संस्थेच्या शिष्टमंडळाची आमदार काशिनाथ दाते यांची भेट | व्यसनमुक्त समाजासाठी सहकार्याचे आश्वासन

**● पारनेर । वीरभूमी –**

तरुण पिढीला व्यसनाधीनतेच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि समाजात व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाने राबविलेल्या 'दहा करोड नशामुक्त महाअभियान' संदर्भात पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दिदी, रामभाई आणि पत्रकार भगवान गायकवाड यांनी आमदार काशिनाथ दाते यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा झाली.

### शासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील : आ. काशिनाथ दाते

■ व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी शासन आणि प्रशासकीय पातळीवर सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. पारनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि युवा पिढीला उज्ज्वल भविष्याकडे नेण्यासाठी अशा लोकजागृती अभियानांची नितांत आवश्यकता आहे, असे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले.

यावेळी ब्रह्माकुमारी साधना दिदी म्हणाल्या की, आधुनिक जीवनशैलीमुळे तरुण पिढी विविध व्यसनांच्या आहारी जात असून ही केवळ व्यक्ती किंवा कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची गंभीर समस्या बनली आहे. या समस्येवर केवळ कायदेशीर उपाय पुरेसे नसून, लोकांच्या मानसिकतेत आणि विचारांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

देशभर सुरू असलेल्या 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत पारनेर तालुक्यातही 'दहा करोड नशामुक्त महाअभियान' प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, ग्रामीण भाग आणि


■ छाया | भगवान गायकवाड

युवकांपर्यंत पोहोचून अध्यात्माच्या माध्यमातून व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला जाणार आहे. युवकांमध्ये सकारात्मक विचारांची पेरणी करून त्यांना निरोगी व जबाबदार जीवनाकडे प्रेरित करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सकारात्मक दृष्टिकोन हाच जीवनाचा पासवर्ड : प्रा. प्रशांत देशमुख

### शांताराम काळे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन | ग्रंथालय व आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

**● अकोले । वीरभूमी–**

श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेचे सचिव, ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक शांताराम काळे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. प्रशांत देशमुख यांनी 'जीवन सुंदर आहे' या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. जीवनाचा पासवर्ड म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन असून, मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम आवश्यक आहेत, असा संदेश त्यांनी दिला.

श्री स्वामी समर्थ विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश टाकळकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रशांत देशमुख, प्रा. एस. झेड. देशमुख, बाबासाहेब देशमुख, माधव गभाले, काशिनाथ साबळे, धोंडोपंत बांबळे, पांडुरंग भांगरे, श्रीनिवास वाणी, शंभू नेहे, राजेश नवले, नितीन चोथवे, प्रकाश महाले, शिवाजी नरसाळे, विलास महाले, निलेश साकुरे, गोकुळ कानकाटे, शेखर वालझाडे, संतोष बनसोडे, सुरेश खांडगे, अनंत घाणे, राहुल राऊत, अल्ताफ शेख यांच्यासह तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.


■ छाया | विद्याचंद्र सातपुते

प्रा. देशमुख यांनी कळसुबाई मोहिमेतील अनुभव, घोरपडीच्या चिकाटीचे उदाहरण, कुसुमाग्रज यांच्या 'कणा' कवितेचा तसेच अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या विचारांचा संदर्भ देत स्वाभिमान, सकारात्मक विचार, संघर्ष आणि जिज्ञासू वृत्तीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. मोबाईलचा वापर मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता ज्ञान, कौशल्य आणि रोजगाराच्या संधींसाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या समृद्ध ग्रंथालयाचे उद्घाटन तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्रकाश टाकळकर यांनी शांताराम काळे यांच्या पत्रकारिता, समाजकार्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेली अभ्यासिका व ग्रंथालय ही समाजासाठी मोठी देणगी असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक प्राचार्या मंजुषा काळे यांनी केले. सूत्रसंचालन विनायक साळवे यांनी, तर आभार मुख्याध्यापक सतीश काळे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

## शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन तातडीने जाहीर करा; जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

राज्यातील शालेय क्रीडा स्पर्धा दरवर्षी जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या नियोजन प्रक्रियेनुसार आयोजित केल्या जातात. मात्र यंदा ऑगस्ट महिना सुरू होऊनही खेळाडू नोंदणी, स्पर्धांचे वेळापत्रक आणि आयोजनाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने माध्यमिक शाळांतील क्रीडा शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी (डीएसओ) यांच्या पोर्टलद्वारे खेळाडूंची नोंदणी आणि स्पर्धांचे नियोजन केले जात होते. यंदा ही प्रक्रिया स्पोर्ट्स महाराष्ट्र विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र संबंधित संकेतस्थळ अद्याप कार्यान्वित नसल्यामुळे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली नाही.

नवीन प्रणालीमध्ये प्रत्येक विद्यार्थी खेळाडूसाठी पहिलीच्या जनरल रजिस्टरची प्रत, जन्मदाखला आणि आधार कार्ड ही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी खेळाडू असल्याने एवढ्या कमी कालावधीत सर्व कागदपत्रे संकलित करून स्कॅन करणे व ऑनलाइन अपलोड करणे हे अत्यंत जिकिरीचे आणि अशक्यप्राय काम ठरणार आहे.

स्पर्धांचे वेळापत्रक अचानक जाहीर झाल्यास शिक्षकांवर अतिरिक्त प्रशासकीय ताण येईल, तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने संकेतस्थळ सुरू करून खेळाडू नोंदणीसाठी पुरेसा कालावधी द्यावा, तसेच जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांचे वेळापत्रक आगाऊ जाहीर करावे, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने केली आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# कुकडी-सिना कालव्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही । कालव्यांची वहन क्षमता वाढविण्यासाठी तीन महिन्यांत सर्व्हे करून अहवाल सादर करण्याचे निर्देश




**● कर्जत । वीरभूमी –**
कुकडी प्रकल्प हा अनेक गावांसाठी जीवनदायी ठरणारा महत्त्वपूर्ण सिंचन प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत कुकडी व सिना प्रकल्पाच्या कालव्यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत कुकडी व सिना प्रकल्प लाभक्षेत्रातील विविध कामांचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत येथील शिवपार्वती मंगल कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

बैठकीदरम्यान उपस्थित शेतकरी व प्रकल्पग्रस्तांनी कालव्यांच्या दुरुस्ती, मोजणी, भूसंपादन मोबदला, कमांड एरियातील शेतीला पाणी उपलब्ध करून देणे यासह विविध मागण्या पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्यासमोर मांडल्या. यावेळी पालकमंत्र्यांनी शेतकरी व प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे जाणून घेत त्यांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' घडविण्याचे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पाची पाणी वहन क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

कालव्यांच्या दुरुस्तीसाठी यापूर्वीही निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र, प्रकल्पाची भविष्यातील गरज लक्षात घेऊन कालव्यांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागाने तीन महिन्यांच्या कालावधीत सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल सादर करावा. त्यानंतर दुरुस्ती व क्षमतावाढीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुकडी प्रकल्पातील भूसंपादन व मोबदल्याच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल. शासन कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असेही पालकमंत्री म्हणाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १ लाख ३२ हजार लाभार्थ्यांना लाभ मिळाला असल्याची माहिती त्यांनी दिली.

कुकडी व सिना प्रकल्पाशी संबंधित सर्व समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी पुढील आठवड्यात कर्जत तहसील कार्यालयात बैठक घेण्यात येईल, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

यावेळी उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, तहसीलदार रवी सत्वन, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व. मोतीलालजी गुगळे यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक पिढ्यांचा उद्धार

## सतीश गुगळे । श्री तिलोक जैन विद्यालयात पुण्यतिथीनिमित्त वार्षिक पारितोषिक वितरण

**● पाथर्डी । वीरभूमी –**
दानवीर स्व. मोतीलालजी गुगळे यांच्या दूरदृष्टीमुळे शिक्षणाचा पाया मजबूत झाला असून, त्यांच्या कार्यामुळे लाखो विद्यार्थी आणि अनेक पिढ्यांचा उद्धार झाला, असे प्रतिपादन सतीश गुगळे यांनी केले. श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे आद्य अध्यक्ष स्व. मोतीलालजी गुगळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री तिलोक जैन विद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.


■ छाया । अनिल खाटेर

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सतीश गुगळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जालना जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी तथा विद्यालयाचे माजी विद्यार्थी रमेश मिसाळ, खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ. ललित गुगळे, कार्यकारी मंडळाचे सदस्य कांतीलाल गुगळे, संपतलाल गांधी, घेवरचंद भंडारी, चांदमल देसर्ड, डॉ. सचिन गांधी, डॉ. अभय भंडारी, विश्वजीत गुगळे, महेंद्र गुगळे, सोनू गुगळे, प्राचार्य अजय भंडारी, प्रा. विजय तागड, राजेंद्र गुगळे, पर्यवेक्षक भारत गाडेकर, विभागप्रमुख सुधाकर सातपुते आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे रमेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजच्या स्पर्धात्मक युगात अपयशाने खचून न जाता कठोर परिश्रम, सातत्य, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येते, असे सांगितले. सर्वांगीण विकासासाठी सहशालेय उपक्रम, चिकित्सक विचार, सहकार्याची भावना, आत्मविश्वास, इच्छाशक्ती आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

विश्वस्त डॉ. ललित गुगळे व उद्धव चन्ने यांनी स्व. मोतीलालजी गुगळे यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. पर्यवेक्षक भारत गाडेकर यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

यावेळी कला, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १०० विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी रमेश मिसाळ यांनी आपल्या यशामध्ये संस्थेचा मोठा वाटा असल्याचे सांगत कृतज्ञतेपोटी संस्थेला एक लाख रुपयांची देणगी जाहीर करून प्रदान केली.

प्रास्ताविक प्राचार्य अजय भंडारी यांनी केले. सूत्रसंचालन सुनील कटारिया यांनी, तर आभार विभागप्रमुख सुधाकर सातपुते यांनी मानले.

# गटविकास अधिकारी सोनल शहा यांची बदनामी केल्याने शेवगाव पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल

## सोशल मीडियावर खोटी माहिती, संपादित छायाचित्रे व बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याचा आरोप

**● शेवगाव । वीरभूमी –**
मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या ग्रामपंचायत मूल्यांकन प्रक्रियेशी कोणताही संबंध नसतानाही खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून सोशल मीडियासह विविध माध्यमांतून बदनामी केल्याप्रकरणी शेवगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या फिर्यादीवरून उमेश भालसिंग (रा. वाघोली, ता. शेवगाव) आणि शिवाजी भिसे यांच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात मंगळवारी (ता. ४) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपींनी विविध आंदोलनांदरम्यान तसेच मोबाईल, सोशल मीडिया पोस्ट, स्टेटस, संपादित छायाचित्रे आणि इतर माध्यमांतून बदनामीकारक मजकूर प्रसारित केला. कोणताही पुरावा नसताना भ्रष्ट अधिकारी म्हणून संबोधून वैयक्तिक व प्रशासकीय प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, परवानगीशिवाय फेसबुकवरील छायाचित्राचा वापर करून त्यास बदनामीकारक मजकूर जोडून प्रसारित करण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. ग्रामसेवकांना मुख्यालयी राहण्याचे आदेश दिल्यानंतर शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याच्या उद्देशाने निषेधात्मक पोस्ट टाकण्यात आल्याचा तसेच त्यांच्या नियुक्तीबाबत दिशाभूल करणाऱ्या बातम्या आणि संदेश प्रसारित करून ग्रामविकास विभागातील अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये प्रतिमा जाणीवपूर्वक मलीन करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे आपली अब्रू, प्रतिष्ठा आणि प्रशासकीय विश्वासार्हतेला धक्का पोहोचल्याचे शेवगावच्या गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेने शेवगावात राजकीय व प्रशासकीय संघर्ष तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या ग्रामपंचायत मूल्यांकन प्रक्रियेशी माझा कोणताही संबंध नव्हता. तरीही माझ्याविरुद्ध बिनबुडाचे व बदनामीकारक आरोप करून सोशल मीडियाच्या माध्यमातून माझी प्रतिमा जाणीवपूर्वक मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे कायदेशीर तरतुदीनुसार शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.
>
> **– सोनल शहा,**
> गटविकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबतच्या काँग्रेसच्या आक्षेपार्ह वक्तव्याचा सुषमा रावडे यांच्याकडून निषेध

**● पारनेर । वीरभूमी–**
उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसकडून करण्यात आलेल्या गुंगी गुडिया या उल्लेखाचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) पारनेर तालुका महिला अध्यक्षा सुषमा रावडे यांनी तीव्र निषेध केला आहे. हा प्रकार महिलांच्या सन्मानावर आघात करणारा, अपमानास्पद आणि असंसदीय राजकीय संस्कृतीचे दर्शन घडवणारा असल्याचे त्यांनी म्हटले.



सुषमा रावडे म्हणाल्या की, लोकशाहीत सरकार किंवा धोरणांवर टीका करणे हा विरोधकांचा अधिकार आहे. मात्र, एखाद्या महिला नेत्याचा अवमान करणारी भाषा वापरणे कोणत्याही सुसंस्कृत राजकारणाला शोभणारे नाही. महिलांना कमी लेखणारे किंवा त्यांची प्रतिमा मलिन करणारे शब्द समाजात चुकीचा संदेश देतात. राजकीय मतभेद व्यक्त करताना सभ्यता आणि संयम राखणे ही प्रत्येक पक्षाची जबाबदारी आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, इतिहासात 'गुंगी गुडिया' हा शब्द माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबाबतही वापरण्यात आला होता आणि त्यावर व्यापक टीका झाली होती. त्यामुळे अशा अवमानकारक शब्दांचा पुनर्वापर करणे अधिकच दुर्दैवी आहे.

काँग्रेस नेतृत्वाने या वक्तव्याबद्दल सुनेत्रा पवार यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी सुषमा रावडे यांनी केली. महिलांच्या सन्मानाच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ठामपणे उभा राहील, असा इशाराही त्यांनी दिला. राजकीय संवादात वैचारिक संघर्ष व्हावा, मात्र महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचवणारी भाषा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# कर्जत जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीसाठी निधी देण्याची विखे पाटील यांची ग्वाही

## वकील संघाच्या संघर्षाला यश । मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या सहकार्याबद्दल व्यक्त केले आभार

**● कर्जत । वीरभूमी –**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या सहकार्याने कर्जत येथे जिल्हा सत्र न्यायालयास मंजुरी मिळाली असून, न्यायालयाच्या इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

कर्जत न्यायालयात वकील संघाच्या पदाधिकारी व सदस्यांची सदिच्छा भेट घेतल्यानंतर आयोजित कार्यक्रमात मंत्री विखे पाटील यांचा वकील संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष संग्राम ढेरे, उपाध्यक्ष डी. जे. चव्हाण, सचिव अविनाश मते, बाळासाहेब शिंदे, शिवाजी अनुभुळे यांच्यासह वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



यावेळी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, विधी व न्यायमंत्री असताना कर्जत येथे जिल्हा सत्र न्यायालयाच्या मागणीसाठी वकील संघाने सातत्याने आंदोलन व पाठपुरावा केला होता. त्या संघर्षाला अखेर यश मिळाले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रस्तावाला मंजुरी दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

या मागणीसाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यासह सर्वांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचेही त्यांनी नमूद केले.

वकील संघाच्या मागणीनुसार न्यायालयाच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही देतानाच वकिलांच्या स्वतंत्र कक्षासाठी कृषी विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले. हा प्रस्ताव कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे आश्वासनही मंत्री विखे पाटील यांनी दिले.

# रखडलेल्या पाणी पुरवठा योजनांना वाढीव निधी देण्यास पाणीपुरवठा मंत्री सकारात्मक

## आ. आशुतोष काळे यांची माहिती । मंत्रालयात झालेल्या बैठकीत मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडून सकारात्मक भुमिका

**● कोपरगाव । वीरभूमी –**
जल जीवन मिशन योजने अंतर्गत कोपरगाव मतदार संघातील अनेक पाणीपुरवठा योजनांची कामे तांत्रिक अडचणी, प्रशासकीय मंजुरी आणि वाढीव निधीची मंजुरी नसल्यामुळे प्रलंबित आहेत. त्याबाबत बुधवार (दि.८) रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ.आशुतोष काळे यांनी मतदार संघातील जल जीवन मिशन योजने अंतर्गत अनेक पाणीपुरवठा योजनांच्या कामांना कामांना अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीबरोबरच पाणी पुरवठा योजनांच्या अडचणीकडे पाणीपुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांचे लक्ष वेधले. सर्व परिस्थिती समजावून घेत मंत्री महोदयांनी वाढीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देवून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

कोपरगाव मतदार संघातील रखडलेल्या पाणी पुरवठा योजनांना गती मिळावी यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना.गुलाबराव पाटील यांच्याकडे विशेष बैठक घेण्याची मागणी केली होती. त्या मागणीनुसार बुधवार (दि.८) रोजी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी,कुंभारी, मायगाव देवी, सुरेगाव, मळेगाव थडी, धारणगाव, रवंदे, रांजणगाव देशमुख, शिंगणापूर व वारी कान्हेगाव तसेच मतदार संघातील राहाता तालुक्यातील रुई-शिंगवे, पुणतांबा व नपावाडी येथील जल जीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजनांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी केली. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून काम पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांना साठवण तलाव बांधण्यासाठी निधी देण्यात यावा. यासोबतच कोपरगाव तालुक्यातील पूर्व भागातील उक्कडगाव गोधेगाव, शिरसगाव, सावळगाव, उक्कडगाव, घोयेगाव, तळेगाव-मळे, धोत्रे, तिळवणी, आपेगाव, कासली, लौकी, भोजडे, आदी गावांसाठी नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मंजूर करावी. कोकमठाण येथील पाणी पुरवठा योजनेच्या कामास मंजूरी द्यावी तसेच कोकमठाणसह मढी बु., कारवाडी, वेळापुर, ब्राम्हणगांव, धामोरी, टाकळी, मोर्विस, काकड-मल्हारवाडी, पढेगांव, करंजी बु., खिर्डी गणेश, संवत्सर, धोत्रे, माहेगांव देशमुख, मंजूर, शहाजापूर, नाटेगांव आदी गावातील पाणीपुरवठा योजनेच्या कामासह आवश्यक जागा संपादनास मंजुरी देण्यात यावी. माहेगाव देशमुख येथील जलजीवन मिशन योजनेच्या वाढीव प्रस्तावास मान्यता मिळावी. तसेच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून काम पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी साठवण तलाव बांधण्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या सर्व मागण्यांना पाणीपुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांनी सहमती दिली आहे.



■ छाया । जनार्दन जगताप

कोपरगाव विधानसभा मतदार संघातील विविध पाणीपुरवठा योजनांसाठी आमदार आशुतोष काळे यांनी जवळपास ३०० कोटीचा निधि आणला आहे. परंतु अनेक पाणी पुरवठा योजनांना आवश्यक असणाऱ्या सुधारित प्रशासकीय मान्यता, काही योजनांना साठवण तलावाच्या अडचणी तसेच काही गावांना नवीन पाणी पुरवठा योजना बाबत आमदार आशुतोष काळे यांचा सतत पाठपुरावा सुरु असून विधिमंडळाच्या २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात पाणी पुरवठा योजनेच्या प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्यासंदर्भात त्यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. त्याबाबत वारंवार शासनाकडे पत्रव्यवहारही सुरु असल्याचे पाणीपुरवठा ना. गुलाबराव पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे पाणीपुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील यांनी दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना प्रशासकीय व तांत्रिक अडचणी सोडवून सर्व प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्याचे आदेश दिले असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. या बैठकीस पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव श्रीरंग नाईक, अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक श्रीम. दीपाली देशपांडे, नाशिक विभागाचे मुख्य अभियंता संतोष गव्हाणकर आदी उपस्थित होते.